महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२/गट-क संयुक्त/२०२१/२४ दिनांक : २८ जून, २०२२.

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षा - २०२१**
**तांत्रिक सहायक, विमा संचालनालय संवर्गाच्या निकालाबाबत.**
**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक २६९/२०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार दिनांक ३ एप्रिल, २०२२ रोजी आयोजित महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षा - २०२१ करीता **तांत्रिक सहायक, विमा संचालनालय संवर्गासाठी** विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून तांत्रिक सहायक, विमा संचालनालय (मुख्य) परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल **दिनांक २८ जून, २०२२** रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत संवर्गाकरीता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी विहित कालावधीत अर्ज करणाऱ्या तसेच परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

**३.** आवश्यक तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**४.** मुख्य परीक्षेचा संयुक्त पेपर क्रमांक १ दिनांक ०६ ऑगस्ट, २०२२ व पेपर क्र.२ दिनांक १० सप्टेंबर, २०२२ रोजी घेण्यात येईल.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या/समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे (SMS) कळविण्यात येईल.

**७.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने आवश्यक माहिती तसेच परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पद्धतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्वीकारार्ह ठरतील.

ठिकाण : मुंबई

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई